लोकमत

# गाव पातळीवर आरोग्याविषयी साक्षरता वाढविणे अधिक गरजेचे

## याशनी नागराजन : जिल्हा परिषदेतील बैठकीत आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : 'आज मानसिक समस्यांचे प्रमाण वाढत आहे, परंतु त्या प्रमाणात निदान आणि उपचार सुविधा उपलब्ध नाहीत. ग्रामीण भागात अशा सुविधा जवळजवळ नसतात. आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्य समस्यांचे निदान आणि उपचार करण्याचे प्रशिक्षण देऊन गाव पातळीवर आरोग्याविषयी साक्षरता वाढविणे गरजेचे आहे, असे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी व्यक्त केले.

सातारा जिल्ह्यातील माण आणि महाबळेश्वर तालुक्यामध्ये 'मानसिक आरोग्य' या विषयावर केल्या गेलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष सादर करण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी 'फाउंडेशन फॉर मेडिकल रिसर्च' संस्थेच्या वतीने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम व जिल्हा आरोग्यविभाग यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.महेश खलिपे, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमच्या मानसोपचार तज्ज्ञ डॉ.देविका नायर, केईम हॉस्पिटलच्या (पुणे) मानसोपचार विभागाचे प्रमुख डॉ. वासुदेव परळीकर, एनआयएमएचएएनएस संस्थेचे डॉ. नवीन कुमार, फाउंडेशन फॉर मेडिकल रिसर्च संस्थेच्या संचालक डॉ. नर्गिस मिस्त्री, वरिष्ठ संशोधक डॉ. शिल्पा करवंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



सातारा जिल्हा परिषद सभागृहात 'मानसिक आरोग्य' या विषयावर बैठक पार पडली. यावेळी याशनी नागराजन यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीला माण आणि महाबळेश्वर तालुक्यांतील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी, मानसोपचार तज्ज्ञ आदी उपस्थित होते.